प्रतिनियुक्तीने नियुक्ती-
भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर.
श्रीमती मा.र.देशमुख,
सहायक कक्ष अधिकारी.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः प्रतिनि २५१८/प्र.क्र.१०४/१४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ८ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :- १) सा.प्र.वि., क्र.एएससी १५१०/प्र.क्र.२१७/१०/१४-अ, दिनांक २०-०१-२०१४ चे आदेश
२) सा.प्र.वि., क्र.एएससी १५१०/प्र.क्र.२१७/१०/१४-अ, दिनांक २९-०८-२०१८ चे आदेश
३) गृहनिर्माण विभाग नस्ती क्र.भानिका २०१८/प्र.क्र.७२/गृनिधो-१

<u>शासन आदेश</u>

संदर्भाधिन क्र.१ येथील आदेशान्वये श्रीमती मा.र.देशमुख, सहायक कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांची, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ यांच्या कार्यालयात ४ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने सेवा उपलब्ध करुन देण्यात आली होती. श्रीमती देशमुख या दिनांक ०२-०६-२०१४ पासून राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ येथे कार्यरत आहेत. श्रीमती देशमुख यांचा **चार वर्षाचा** प्रतिनियुक्ती कालावधी पूर्ण झाल्यामुळे संदर्भाधिन क्र.२ येथील आदेशान्वये श्रीमती देशमुख यांच्या प्रतिनियुक्तीस दिनांक ०१-०६-२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर, या कार्यालयातील **अधिक्षक, वर्ग-२** हे पद मंत्रालयीन संवर्गातील श्री. सं.ना.खैरकर, सहायक कक्ष अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करुन सदरहू रिक्त पद भरण्यात आले होते. तथापि, श्री. खैरकर यांच्या सेवा प्रकृत्तीच्या कारणास्तव या विभागाच्या दिनांक २२-०४-२०१९ च्या पत्रान्वये मंत्रालयीन विभागात प्रत्यावर्तीत करण्यात आल्या आहेत.

३. भाडे नियंत्रण कायदा न्यायालयात पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत अशी न्यायालयीन प्रकरणे टाळण्याच्या दृष्टीने तसेच एका रिट याचिकेच्या अनुषंगाने, भाडे नियंत्रण कायदा न्यायालयांमधील रिक्त पदे ३ महिन्यांच्या आत भरण्याचे आदेश दिनांक ०७-०२-२०१८ रोजी दिलेले आहेत असे नमूद करुन गृहनिर्माण विभागाने संदर्भाधिन क्र. ३ येथील प्रस्तावान्वये श्री.सं.ना.खैरकर, स.क.अ. यांच्या प्रत्यावर्तानंतर रिक्त झालेल्या पदावर श्रीमती मा.र.देशमुख, यांची भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर येथे **अधिक्षक, वर्ग-२** या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत करावयाची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग, शासन

निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२०/१४, दिनांक ३१.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील तरतूदीनुसार मंत्रालयीन विभागातील श्रीमती मा.र.देशमुख, सहायक कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग (सध्या प्रतिनियुक्तीने कार्यरत राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर) यांच्या सेवा गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारीतील भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर या कार्यालयातील **"अधिक्षक वर्ग-२"** या पदावर प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

अ.क्र.	**सहायक कक्ष अधिकाऱ्याचे नांव व विभाग**	**सध्याचे प्रतिनियुक्तीचे ठिकाण**	**नेमणूक करावायाचे प्रतिनियुक्तीचे ठिकाण**	**प्रतिनियुक्तीच्या ठिकाणावरील पद**
१	श्रीमती मा.र.देशमुख, महसूल व वन विभाग	राज्य माहिती आयोग, नागपूर खडपीठ, नागपूर	भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर	अधिक्षक, वर्ग-२

५. श्रीमती देशमुख ह्या दिनांक ०१-०६-२०१४ ते ०१-०६-२०१९ पर्यंत प्रतिनियुक्तीवर होत्या त्यांना पुन्हा प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यासाठी त्यांनी मूळ विभागात मूळ संवर्गात किमान ३ वर्षे सेवा कालावधी (Cooling Off) पूर्ण करणे आवश्यक आहे. सदरहू अट श्रीमती देशमुख पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांची मूळ विभागातील ३ वर्षे (सेवा) कालावधी पूर्ण करण्याची अट एक विशेष बाब म्हणून शिथिल करुन श्रीमती मा.र.देशमुख, सहायक कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग (सध्या प्रतिनियुक्तीने कार्यरत राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ) यांची भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर या कार्यालयात प्रथमत: २ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

(अ) ज्या तारखेला शासकीय सेवेतील (भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर) या कार्यालयातील **अधिक्षक, वर्ग-२** पदाचा कार्यभार सुपूर्द करील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला संबंधित कर्मचारी आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारील त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/संवर्ग नियंत्रण अधिकारी/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्याला मूळ विभागाकडे परत पाठवण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठवण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

(ड) त्याने मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्याला मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

६. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत संबंधित कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही. म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा...इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७-१२-२०१६ व १६-०२-२०१८ मधील तरतुदी विचारात घेऊन,

महसूल व वन विभागाने प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती याबाबत गृहनिर्माण विभाग/गृनिधो १ यांच्याशी सल्लामसलत करुन ठरवाव्यात.

७. श्रीमती देशमुख, सहायक कक्ष अधिकारी महसूल व वन विभाग यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी त्यांचे प्रशासकीय विभाग आणि गृहनिर्माण विभाग/गृनिधो-१ यांचेमार्फत हाताळण्यात येतील

८. श्रीमती देशमुख,सहायक कक्ष अधिकारी या सध्या राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. त्यांची या आदेशान्वये भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर या ठिकाणी **अधिक्षक, वर्ग-२** या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे श्रीमती देशमुख यांना नवीन प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी तत्काळ कार्यमुक्त करावे.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०८१६२०५७७८०७ असा आहे. सदरहू आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.13 16:34:55 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्रीमती मा.र.देशमुख, सहायक कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, महसूल व वन विभाग/ गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

३) सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, तहसिल कार्यालय,(शहर), पहिला माळा, आकाशवाणी चौक, नागपूर-४४०००१

४) सह/उप सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग/गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या विभागातील संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देताना परिच्छेद ६. मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करुन काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत या कार्यासनाकडे तात्काळ पाठविण्यात यावी.

५) सह/उप सचिव (गृनिधो-१), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
त्यांना विनंती करण्यात येते की, श्रीमती मा.र.देशमुख, सहायक कक्ष अधिकारी यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने त्वरेने उपलब्ध होतील याबाबत त्यांनी राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर यांच्याकडे पाठपुरावा करावा.

६) सा.प्र.वि./का.क्र.१४-अ (संग्रहार्थ/निवड नस्ती)